# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय : हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,

सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, मुंबई -४०००१३.

दूरध्वनी क्र. ०२२-४३२२६८२५/२६ ई-मेल : mlwbpro53@gmail.com


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मका/प्रजवि/२०२२/९२३ दिनांक : २४/०८/२०२२

परिपत्रक :

विषय : **आर्थिक लाभ योजनांचे अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे स्विकारणेबाबत.**
**(सर्वसाधारण शिष्यवृत्ती, परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती, क्रीडा शिष्यवृत्ती, पाठ्यपुस्तक अर्थसहाय्यता व साहित्य प्रकाशन अनुदान योजना)**

संदर्भ : **अ) सर्वसाधारण शिष्यवृत्ती योजना -**

१) मका/ग्रंथालय/१६-१७/१९ दि.२३.०६.२०१६ (मुख्य परिपत्रक)

२) मका/ग्रंथालय/२०२०-२१/१०४ दि.१८.०९.२०२२ (ग्रेड व शैक्षणिक खंडाबाबत)

३) मका/प्रसिद्धी/२०२१-२२/१३३ दि.२१.०८.२०२१ (सुधारित तक्ते)

४) मका/प्रजवि/२०२२/२२ दि.०३.०३.२०२२ (व्याव. व अव्यावसायिक अभ्यासक्रमांबाबत)

**ब) परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती योजना –**

५) मका/ग्रंथालय/१६-१७/२० दि.२३.०६.२०१६ (मुख्य परिपत्रक)

६) मका/ग्रंथालय/१७-१८/१६५ दि.२८.०३.२०१८ (शैक्षणिक खंड)

**क) क्रीडा शिष्यवृत्ती योजना –**

७) मका/ग्रंथालय/१६-१७/२१ दि.२३.०६.२०१६

८) जिल्हा क्रीडा अधि., नाशिक यांचे पत्र –जिक्रीसं/मकामंडळ/२०१८-१९/का-१ दि.२९.१०.२०१८

**ड) पाठ्यपुस्तक योजना –**

९) मका/ग्रंथालय/२०१६-१७/११७ दि.३०.०६.२०१६ (मुख्य परिपत्रक)

१०) मका/ग्रंथालय/२०१७-१८/८९ दि.०२.११.२०१७ (उत्पन्न मर्यादा वाढ)

**ई) साहित्य प्रकाशन अनुदान योजना –**

११) मका/ग्रंथालय/१६-१७/११७ दि.३०.०६.२०१६ (मुख्य परिपत्रक)

मंडळाच्या आर्थिक लाभाच्या योजनांचा लाभ सन २०२०-२१ पासून www.public.mlwb.in या संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यानुषंगाने संदर्भीय नियम व अटींच्या अधीन राहून मंडळाच्या सर्वसाधारण शिष्यवृत्ती योजना, क्रीडा शिष्यवृत्ती योजना, परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती योजना व पाठ्यपुस्तक अर्थसहाय्य योजना, पुस्तक प्रकाशन अनुदान योजना यांचे अर्ज संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन स्विकारण्यास व पात्र लाभार्थींना लाभ मिळवून देणेकरिता कार्यवाही करण्यास खालीलप्रमाणे कालमर्यादा निश्चित करण्यात येत आहे.

कृपया मागे पहा

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशिल | अंतिम मुदत |
| --- | --- | --- |
| | **सर्वसाधारण शिष्यवृत्ती योजना / परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती योजना व क्रीडा शिष्यवृत्ती योजना** | |
| १. | अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज सादर करणे | ऑक्टोबर अखेरपर्यंत |
| २. | केंद्रांनी अर्ज तपासून गट कार्यालयास पाठविणे | नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत |
| ३. | गट कार्यालयांनी अर्ज तपासून विभागीय कार्यालयास पाठविणे | नोव्हेंबर अखेरपर्यंत |
| ४. | विभागीय कार्यालयांनी अर्थसंकल्पीय तरतुदीच्या अधीन राहून मंजुरीपत्रक निर्गमित करणे | डिसेंबर अखेरपर्यंत |
| | **पाठ्यपुस्तक अर्थसहाय्य योजना** | |
| १. | अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज सादर करणे | ऑक्टोबर अखेरपर्यंत |
| २. | केंद्रांनी गट कार्यालयात अर्ज पाठविणे | नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत |
| ३. | गट कार्यालयांनी अर्थसंकल्पीय तरतुदीच्या अधीन राहून मंजुरीपत्रक निर्गमित करणे | नोव्हेंबर अखेरपर्यंत |
| ४. | पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करणे | डिसेंबर अखेरपर्यंत |
| | **साहित्य प्रकाशन अनुदान योजना** | |
| १. | अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज सादर करणे | नोव्हेंबर अखेरपर्यंत |
| २. | अर्जदारांनी ऑनलाईन भरलेला अर्ज व पावती यांची प्रिंट पुस्तकाच्या दोन प्रतींसह संबंधित केंद्रात प्रत्यक्ष (हार्ड कॉपी) जमा करणे | डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत |
| ३. | केंद्रांनी गट कार्यालयात अर्ज पाठविणे | डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत |
| ४. | गट कार्यालयांनी अर्ज तपासून विभागीय कार्यालयास पाठविणे | डिसेंबर तिसऱ्या आठवड्यापर्यंत |
| ५. | विभागीय कार्यालयांनी मध्यवर्ती कार्यालयास साहित्यासह अर्ज सादर करणे | डिसेंबर अखेरपर्यंत |
| ६. | साहित्य परीक्षणानंतर मध्यवर्ती कार्यालय स्तरावर मंजुरी निर्गमित करणे | जानेवारी अखेरपर्यंत |

**संगणक प्रणालीद्वारे अर्ज भरताना घ्यावयाची दक्षता -**

१) संगणक प्रणालीद्वारे अर्ज भरताना मूळ कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहेत. कागदपत्रांच्या छायांकीत प्रती (झेरॉक्स) स्कॅन करुन अर्जासोबत अपलोड करु नयेत.

२) पाठ्यपुस्तक अर्थसहाय्य योजनेकरीता क्रमिक पाठ्यपुस्तक खरेदीचे मूळ बिल स्कॅन करुन अपलोड करावे. मूळ बिलाची प्रत केंद्रात प्रत्यक्ष जमा करण्याची आवश्यकता नाही.

३) अस्पष्ट, खाडाखोड केलेली तसेच छायांकीत (झेरॉक्स) कागदपत्रे अर्जासोबत अपलोड केल्यास अर्ज बाद करण्यात येतील व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अर्जदाराची राहील.

४) संगणक प्रणालीद्वारे साहित्य प्रकाशन अनुदान योजनेचा अर्ज भरणा केल्यानंतर अर्जदाराने ऑनलाईन भरलेला अर्ज व पावती यांची प्रिंट विहित मुदतीत पुस्तकाच्या दोन प्रतींसह संबंधित केंद्रात प्रत्यक्ष (हार्ड कॉपी) जमा कराव्यात. नोव्हेंबर अखेरपर्यंत अर्जदारांनी संबंधित केंद्रात प्रत्यक्ष अर्ज व पुस्तक जमा करणे आवश्यक आहे. उशिरा प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.

५) वरील नमूद अटी वगळता मंडळाच्या प्रचलित इतर नियम अटी संबंधित योजनांना लागू राहतील.

कृपया मागे पहा

अर्ज स्विकृती, अर्ज तपासणी व मंजुरीपत्रक निर्गमित करण्याची प्रक्रिया संगणकीय प्रणालीमार्फत करावयाची असल्याने अर्जाची तपासणी विहित मुदतीत होईल याबाबत संबंधित विभाग प्रमुख / गट प्रमुख यांनी उचित नियोजन करावे.

पुढील आदेश निघेपर्यंत सदर परिपत्रक लागू राहील.

(रविराज इळवे)
कल्याण आयुक्त

प्रत,

१) सर्व अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई.

२) सहायक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये

३) कामगार विकास अधिकारी, कामगार क्रीडा भवन, मुंबई, का.क.भवन, पुणे / नागपूर

४) कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये

५) सर्व केंद्र प्रमुख

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक:२४३०६७१७/२४२२७७५८/४३२२६८००
जा.क्र.: मका/कार्य/२०१५-१६/११२३ दिनांक :- ०१/०८/२०१५

## परिपत्रक

**विषय :- गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजना.**
संदर्भ :- मका/कार्य/२०१४-१५/८०४ दिनांक. २४.०७.२०१४

मध्यवर्ती कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये "असाध्यरोग सहाय्यता योजना" साठी परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.

या परिपत्रकान्वये असाध्यरोग सहाय्यता योजनेचे नाव बदलून **"गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजना"** असे करण्यात येत आहे.

या योजने अंतर्गत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना गंभीर आजार झाल्यास त्याच्या वैद्यकीय उपचाराकरीता आर्थीक सहाय्यता देण्याची मंडळाची योजना आहे.

**वैशिट्ये** :-

१) या योजनेत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना लाभ घेता येतो.

२) कमीत कमी रु.५०००/- ते जास्तीत जास्त रु.२५०००/- पर्यंत आर्थीक लाभ दिला जातो.

३) एकदा लाभ घेतल्यानंतर पुन्हा लाभ घेता येत नाही.

४) या योजने अंतर्गत १)ब्रेन ट्युमर, २)ह्रदय शस्त्रक्रीया, ३) क्षय रोग, ४) एड्स, ५)मुत्रपिंड प्रत्यारोपण, ६) कर्करोग, ७) कोमा, ८) गॅंगरीन ९) गंभीर स्वरुपाचे पॅरालिसीस, १०) गंभीर स्वरुपाचे सिकलसेल , ११) इतर गंभीर स्वरुपाचे आजार ज्यास मंडळाने चिकित्सकांच्या सल्लयाने गंभीर आजार म्हणून मान्यता दिलेली असावी. या आजारावरील वैद्यकीय उपचारासाठी आर्थीक लाभ दिला जातो.

५) आर्थीक सहाय्यता रकमेचा तपशील.

| क्रं. | रुग्णाचा झालेला खर्च | आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | रु. १०,०००/- ते रु.२५,०००/- पर्यंत | ५,०००/- रुपये |
| २ | रु. २५,००१/- ते रु.५०,०००/- पर्यंत | १०,०००/- रुपये |
| ३ | रु. ५०,००१/- ते रु.७५,०००/- पर्यंत | १५,०००/- रुपये |
| ४ | रु. ७५,००१/- ते रु.१,००,०००/-पर्यंत | २०,०००/- रुपये |
| ५ | रु.१,००,००१/- पेक्षा जास्त खर्च | २५,०००/- रुपये |

**नियम व अटी :-**

१) अर्जदाराने मंडळाच्या जवळच्या कामगार कल्याण केंद्रामध्ये विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

२) संबधित केंद्र प्रमुखांनी सदर अर्जदारास केंद्राचे सर्वसाधारण सभासद म्हणून नोंदणी करावी.

३) अर्जदाराने सर्व शासकीय, महानगरपालिका/नगरपालिका,सार्वजनिक, शासनमान्य, धर्मादाय आणि खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेला असावा किंवा उपचार सुरु असावा.

४) सदर रुग्णालयात घेतलेल्या उपचारांचे / शस्त्रक्रीयेचे कागदपत्र तसेच आजारावर वैद्यकीय उपचाराकरीता झालेल्या खर्चाच्या पावत्या सत्य प्रती सोबत जोडाव्या. पावत्या १ वर्षाच्या आतील असाव्यात.

५) सदर अर्जदारावर उपचार सुरु असल्यास रुग्णाच्या वैद्यकीय उपचाराचा येणारा खर्चाचा वैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला सोबत जोडावा.

६) माहे जून किंवा डिसेंबर ची वेतन पावती सोबत जोडावी ज्यामध्ये कामगार कल्याण निधी कपात केल्याचा उल्लेख असावा.(अर्जदार कामगार असल्यास स्वतःची किंवा पालकाची).

७) अर्जासोबत अर्जदार/ पालक ज्या आस्थापनेत काम करीत आहे त्या आस्थापनेचा कामगार कल्याण निधी भरणा केल्याचा आणि त्यामध्ये जून किंवा डिसेंबर चा निधी मंडळाकडे भरणा केल्याचा धनादेश क्र. व दिनांक मंडळाकडील आस्थापना नोंदणी क्रमांक नमुद करावा.

८) अर्ज मंजुर झाल्यानंतर अर्जदारास रेखांकीत धनादेशाद्वारे रक्कम देण्यात येईल.

९) रुग्णावर रुग्णालयात वैद्यकीय उपचार सुरु असल्यास आर्थीक सहाय्याची रक्कम रुग्णालयाच्या नावाने धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल.

१०) या योजने अंतर्गत मंडळाकडे अर्ज सादर केल्यानंतर अर्ज विचाराधिन असताना रोगी मृत पावल्यास कामगारास अथवा कामगारांच्या वारसाला वरील नियम आणि अटींची पूर्तता करीत असल्यास आर्थीस सहाय्याची रक्कम अदा करण्यात येईल.

या योजने अंतर्गत केंद्र प्रमुखांनी अर्जाची तपासणी करुन अर्ज स्विकारल्या नंतर दहा दिवसांत सदरचे अर्ज गट कार्यालयास सादर करावे. गट प्रमुखानी अर्जाची तपासणी करून त्यांना प्राप्त झालेल्या तारखेपासून दहा दिवसात विभागीय कार्यालयाकडे सादर करावे. विभाग प्रमुखांनी या योजनेच्या नियम व अटी नुसार विभाग स्तरावर ८ दिवसाच्या आत निर्णय द्यावा. जे अर्ज मंजूर होतील, त्याप्रमाणे मंजूर रकमेचा धनादेशाचे वाटप १५ दिवसाच्या आत लाभार्थींना करण्यात यावे. ही योजना राबविताना प्रत्येक स्तरावरील कालमर्यादा पाळणे बंधनकारक राहील.

सदरचे परिपत्रक दिनांक १ ऑगस्ट २०१५ पासून पुढील आदेश निघेपर्यंत अमलात राहील.

सोबत – अर्जाचा नमुना

कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

२) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

३) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

४) प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई

५) सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय,ठाणे/मुंबई/नागपूर/नाशिक/पूणे/
कामगार क्रीडा भवन, मुंबई

६) प्रभारी सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय, अकोला /औरंगाबाद

७) सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागिय कार्यालये.

८) कामगार विकास अधिकारी, का.क.भवन नागपूर/पुणे.

९) कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये).★★★

१०) सर्व केंद्र प्रमुख

★★★ सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक:२४३०६७१७/२४२२७७५८/४३२२६८००

जा.क्र.: मका/कार्य/२०१५-१६/ 29 दिनांक :- 6/1/2016

**परिपत्रक**

विषय :- **गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजना.**

संदर्भ :-१) मका/कार्य/२०१५-१६/११२३ दिनांक. ०१.०८.२०१५

२) ठराव क्र. मकाकम/२१/१३/८/१४२ दिनांक ३१.१२.२०१५

मध्यवर्ती कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भीय क्र. १ अन्वये गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजनासाठी परिपत्रक निर्गमीत करण्यात आलेले आहे. या योजनेच्या सध्याच्या नियमानुसार योजनेचा एकदा लाभ घेतल्यानंतर पुन्हा लाभ घेता येत नाही.

वरील संदर्भ क्र.२ नुसार मंडळाच्या दिनांक १६ अक्टोबर २०१५ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार गंभीर आजार वैद्यकीय उपचार सहायता योजनेतील नियम व अटी नुसार एका व्यक्तीस एका गंभीर आजारा करीता एकदा लाभ दिल्यानंतर पुन्हा दुसरा गंभीर आजार झाल्यास त्यांना दुसऱ्यांदा लाभ देण्यास मान्यता व मंजूरी देण्यात येत आहे.

तरी मंडळाच्या सर्व संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वरीलप्रमाणे नोंद घ्यावी.

कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
२) लेखा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबइ
३) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
४) प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय. मुंबई
५) सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय,ठाणे/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे/ कामगार क्रीडा भवन, मुंबई
६) प्रभारी सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय, अकोला /औरंगाबाद
७) सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागिय कार्यालये.
८) कामगार विकास अधिकारी, का.क.भवन नागपूर/पुणे.
९) कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये).***
१०) सर्व केंद्र प्रमुख

*** सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.